# ठळक आश्वासने

काँग्रेस पक्षाचा जाहीरनामा
लोकसभा निवडणूक
२०१९

## 1 गरिबी निर्मूलन

सर्व भारतीयांना सन्मानाचं जीवन जगता यावं म्हणून, काँग्रेस पक्ष किमान उत्पन्न योजना म्हणजेच न्यूनतम आय योजना (NYAY) सुरु करेल. या योजनेअंतर्गत भारतातील सर्वाधिक गरीब २०% कुटुंबियांना प्रति वर्षी रु.७२०००/- देण्यात येतील. ही रक्कम कुटुंबातील महिलेच्या बँक खात्यात जमा करण्यास प्राधान्य असेल.

## 2 रोजगार क्रांती

देशातील युवकांसाठी, रोजगाराला पहिले प्राधान्य देण्याचे वचन काँग्रेस पक्ष देत आहे. हा रोजगार सार्वजनिक आणि खासगी दोन्ही क्षेत्रांमध्ये देण्यात येईल. आम्ही सार्वजनिक क्षेत्रामध्ये खालील प्रकारे ३४ लाख रोजगार देण्याचे सुनिश्चित करु;

i. मार्च २०२० पूर्वी केंद्र सरकारमधील सर्व ४ लाख रिक्त पदे भरणार.
ii. राज्य सरकारांमधील २० लाख रिक्त पदे भरण्यासाठी, राज्य सरकारांकडे पाठपुरावा करू.
iii. प्रत्येक ग्राम पंचायत आणि शहरी स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये अंदाजे १० लाख नवीन ‘सेवा मित्र’ पदांची निर्मिती करू.

आम्ही खासगी क्षेत्रातील रोजगारांना देखील खालील उपाययोजनांद्वारे चालना देऊ;

i. रोजगार निर्मिती आणि महिलांना अधिकाधिक रोजगार देणाऱ्या व्यवसायांना प्रोत्साहन देऊ.
ii. १०० हून अधिक कर्मचारी असलेल्या व्यवसायांना परिविक्षा (ॲप्रेंटिस) कार्यक्रम लागू करण्यावर भर देऊ.

## 3 शेतकरी आणि शेतमजूर

शेतकऱ्यांसाठी, काँग्रेस पक्ष ‘कर्जमाफी’पासून ‘कर्जमुक्ती’च्या मार्गावर नेण्याचे वचन देत आहे. त्यासाठी शेतीमालाला हमीभाव, उत्पादन खर्चात कपात आणि संस्थात्मक पतपुरवठ्याची हमी देण्यासाठी उपाययोजना प्रभावीपणे राबवण्यात येतील. दरवर्षी कृषीक्षेत्रासाठी स्वतंत्र ‘शेतकरी अर्थसंकल्प’ सादर करु. आम्ही कृषी विकास आणि नियोजनासाठी एक स्थायी राष्ट्रीय आयोग देखील स्थापन करु.

## 4 सर्वांसाठी आरोग्य सुविधा

सर्व नागरिकांना उत्तम आरोग्य सुविधेचा हक्क मिळावा यासाठी कायदा करण्याचे वचन काँग्रेस पक्ष देत आहे. सार्वजनिक रुग्णालये आणि सूचिबद्ध खासगी रुग्णालयांच्या माध्यमातून प्रत्येक नागरिकाला मोफत रोग निदान, बाह्य-रुग्ण सेवा, मोफत औषधे आणि रुग्णालयात भरती करून उपचारांची हमी दिली जाईल. आम्ही आरोग्य सुविधांवरील खर्च दुप्पट करुन २०२३-२४ पर्यंत सकल देशांतर्गत उत्पादनाच्या (GDP) ३ % निधी उपलब्ध करुन देऊ.

## 5 GST २.०

काँग्रेस GST व्यवस्थेत आमूलाग्र बदल करून सुसूत्रीकरण करेल. त्यासाठी एकच दर, निर्यातीवर शून्य जीएसटी, आणि अत्यावश्यक वस्तु आणि सेवांना सवलत हे उपाय केले जातील. आम्ही ग्रामपंचायत आणि नगर पालिकांना देखील GST महसुलातील वाटा देण्याचे वचन देत आहोत.

## 6 सशस्त्र दले आणि निमलष्करी दले

एनडीए सरकारच्या काळात संरक्षणावरील खर्चात मोठ्या प्रमाणात कपात करण्यात आली आहे. काँग्रेस सरकार संरक्षण खर्चात वाढ करेल आणि सशस्त्र दलांच्या गरजा पूर्ण करण्यासाठी भरीव तरतूद करेल. आम्ही पारदर्शक पद्धतीने सशस्त्र दलांचे आधुनिकीकरण गतिमान करु. आमची निमलष्करी दले आणि सैनिकांच्या कुटुंबियांसाठी सामाजिक सुरक्षितता, शिक्षण आणि आरोग्य सुविधांमध्ये व्यापक सुधारणा करू.

## 7 प्रत्येक मुलाला दर्जेदार शिक्षण

इयत्ता १ ते १२ वी पर्यंतच्या विद्यार्थ्यांना सरकारी शाळांमध्ये मोफत व सक्तीचे शिक्षण देण्याचे वचन काँग्रेस पक्ष देत आहे. शैक्षणिक परिणामांवर आम्ही विशेषत्वाने लक्ष केंद्रित करु. शाळांमध्ये अर्हताप्राप्त शिक्षकांची भरती आणि पुरेशा पायाभूत सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी आम्ही शिक्षणावरील तरतूद दुप्पट करुन २०२३-२४ पर्यंत सकल देशांतर्गत उत्पादनाच्या (GDP) ६ % निधी उपलब्ध करुन देऊ.

## 8 महिलांना न्याय

लोकसभा आणि राज्य विधानसभांमध्ये महिलांसाठी ३३ टक्के आरक्षण देण्यासाठी महिला आरक्षण विधेयक १७ व्या लोकसभेच्या पहिल्याच अधिवेशनात मंजूर करण्याचं वचन काँग्रेस पक्ष देत आहे. केंद्र सरकारमध्ये सर्व पदं/रिक्त पदांवर ३३ टक्के जागा महिलांसाठी आरक्षित ठेवण्यात येतील.

## 9 आदिवासी

काँग्रेस पक्ष ‘वन हक्क कायदा २००६’ची खऱ्या अर्थाने तंतोतंत अंमलबजावणी करून या कायद्यांतर्गत हमी दिलेले अनुसूचित जमातीचे हक्क सुरक्षित करू. कोणत्याही वनपट्टे धारकाला अन्याय्य पद्धतीने हुसकावून लावले जाणार नाही. वन उत्पादनांसाठी राष्ट्रीय आयोग स्थापन करू आदिवासींची उपजीविका सुधारण्यासाठी आणि उत्पन्न वाढवण्यासाठी प्रयत्न म्हणून गैर इमारती लाकडासह वन उत्पादनांना किमान समर्थन मूल्य लागू करू.

## 10 हक्काचे घरकुल

स्वतःचे घर किंवा स्वतःची जमीन नसलेल्या प्रत्येक ग्रामीण कुटुंबाला भूखंड देण्यासाठी आम्ही ‘हक्काचे घरकुल कायदा’ मंजूर करू; जेणेकरुन ते कुटुंब त्या जमिनीवर स्वतःचे घर बांधू शकेल.

## 11 द्वेषमूलक गुन्ह्यांचा अंत

NDA सरकारच्या गेल्या ५ वर्षाच्या कार्यकाळात समाजातील कमजोर वर्गाविरुद्ध द्वेषमूलक गुन्हे आणि छळाच्या घटना अनेक पटींनी वाढल्या आहेत. द्वेषाची ही भावना संपवण्यासाठी काँग्रेस प्रयत्न करेल. सामूहिक हिंसाचार आणि प्राणघातक हल्ले, अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, महिला आणि अल्पसंख्याक यांच्यावरील अत्याचारांना पायबंद घालण्यासाठी प्रयत्न करेल. दंगली, सामूहिक हिंसाचार आणि द्वेषमूलक गुन्ह्याच्या प्रकरणांमध्ये हलगर्जीपणा सिद्ध झाल्यास, पोलीस आणि जिल्हा प्रशासनाला जबाबदार धरले जाईल.

## 12 स्वातंत्र्याचा उत्सव

भारताच्या राज्यघटनेतील असहमतीच्या स्वातंत्र्यासह सर्व मूल्यांचे संरक्षण करण्याचे वचन काँग्रेस देत आहे. व्यक्तीस्वातंत्र्य अबाधित ठेवण्यासाठी काँग्रेस एक कायदा मंजूर करेल. ‘आधार’चा वापर आधार कायद्याच्या मूळ उद्देशांपुरताच मर्यादीत ठेवला जाईल. काँग्रेस पक्ष प्रत्येक नागरिकाच्या हक्कांचे संरक्षण करेल. विशेषतः विद्यार्थी, पत्रकार, शिक्षणतज्ज्ञ, कलाकार, सामाजिक कार्यकर्ते आणि स्वयंसेवी संस्थांच्या हक्कांचे रक्षण करेल. काँग्रेस पक्ष जुन्या ठरलेल्या, कालबाह्य, अन्यायकारक आणि लोकांच्या स्वातंत्र्यावर अनुचित पद्धतीने निर्बंध घालणारे कायदे समिक्षा करून रद्द केले जातील.

## 13 आपल्या संस्थांचे संरक्षण

गेल्या पाच वर्षांमध्ये रिझर्व्ह बँक इंडिया, निवडणूक आयोग, माहिती आयुक्त, सीबीआय इत्यादी संस्थांचे खच्चीकरण करण्यात आले. या संस्थांचे पुनरूज्जीवन करण्याचे वचन काँग्रेस पक्ष देत आहे. या संस्थांना संसदेप्रती उत्तरदायी करतानाच त्यांची प्रतिष्ठा, अधिकारआणि स्वायतत्ता काँग्रेस पुर्नस्थापित करेल. निवडणूक प्रक्रिया मुक्त आणि निष्पक्ष पद्धतीने होतील, हे सुनिश्चित केले जाईल. NDA सरकारद्वारा जारी अपारदर्शक इलेक्टोरल बाँड्स रद्द करून एक राष्ट्रीय निवडणूक निधी स्थापन करण्यात येईल. मान्यताप्राप्त राजकीय पक्षांना निवडणुकीच्या वेळी हा निधी वितरीत केला जाईल.

## 14 शहरे आणि शहरी प्रशासन

काँग्रेस पक्ष शहरे आणि परिसराशी निगडित समस्यांवर उपाय करण्यासाठी एक सर्वसमावेशक धोरण आणण्याचे वचन देत आहे. यामध्ये शहरांचे प्रशासन, आजीविका, गृहनिर्माण, वसाहत, प्रदूषण, हवामान बदल, शहरी वाहतूक आणि आपत्ती व्यवस्थापन यांचा समावेश राहील. शहरी गरीबांसाठी आम्ही आवास हक्क आणि मनमानी पद्धतीने त्यांना हटविण्यापासून संरक्षणाचे आणि झोपडपट्टी सुधार आणि रूपांतर योजनेचे वचन देत आहोत. आम्ही थेट निर्वाचीत महापौरांद्वारे शहरे आणि परिसरांसाठी प्रशासनाचा एक नवा आकृतीबंध लागू करू. आम्ही शहरांना आर्थिक वृद्धीच्या यंत्रणेत रूपांतरीत करू.

## 15 पर्यावरण आणि हवामान बदल

जागतिक तापमानवाढीविरूद्धचा लढा आणि पर्यावरणाच्या संरक्षणामध्ये भारत सर्वात आघाडीवर राहील, असा कृती कार्यक्रम आखण्याचे वचन काँग्रेस देत आहे. आम्ही नमूद करतो की, हवेचे प्रदूषण ही एक राष्ट्रीय सार्वजनिक आरोग्य आपत्ती आहे. यासोबतच राष्ट्रीय स्वच्छ हवा कार्यक्रमाला आम्ही लक्षणीय बळ देऊ. वने, वन्यजीव, जलाशय, स्वच्छ नद्या आणि सागरी किनारे हे सार्वजनिक मालकीचे मौल्यवान नैसर्गिक स्त्रोत आहेत; आम्ही त्याचे संरक्षण करू. आम्ही एक स्वतंत्र, सक्षम आणि पारदर्शक पर्यावरण संरक्षण प्राधिकरणाची स्थापना करू. वनविभागाच्या भूमिकेच्या परिभाषेत बदल करून आपले वनक्षेत्र वाढवू.



**“दिलेले प्रत्येक आश्वासन मी पाळतो.”**

राहुल गांधी

**भारतीय राष्ट्रीय कांग्रेस**